अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.७२/२०२४
जा.क्र उआ(सा.प्र.)/ आस्था/ ५११२ दि.१२/८/२०२४

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/७२/२०२४

श्री.रमेश शिवाजी लोखंडे,
२४ निलावती निवास, कल्याणनगर,
भाग-२ जि.प.शाळेसमोर,
जुळे, सोलापूर-४१३२२४

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

---------------- प्रतिवादी

श्री.रमेश शिवाजी लोखंडे, २४ निलावती निवास, कल्याणनगर, भाग-२ जि.प.शाळेसमोर, जुळे, सोलापूर-४१३२२४ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.२६/६/२०२४ (आ.क्र.५०२६, दि.२८/६/२०२४) रोजी प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/३२७२, दि.०२/७/२०२४ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| २६/६/२०२४ | २८/६/२०२४ | २७/७/२०२४ | ०२/७/२०२४ | ० |

आपल्या कार्यालयाकडील प्राप्त झालेली माहिती असमाधानकारक आहे. आपण प्रसिद्ध केलेल्या यादीनुसार स्वच्छता निरिक्षक पदासाठी पात्र उमेदवारांचे शैक्षणिक व अनुभव दाखले मिळवित व मी विचारलेली माहिती उपलब्ध करुन देणे हे अडचणीचे का आहे? याचा खुलासा द्यावा. आपण स्वच्छता निरिक्षक पदाची पात्र उमेदवारांची यादी ही कागदपत्रे पडताळणी करुन लावलेली असताना ती कागदपत्रे देण्यास काय अडचण आहे. त्याबाबत काय कार्यवाही चालू आहे याचा खुलासा द्यावा. उमेदवारांना नियुक्ती दिलेली आहे का? असे नमूद करुन दि.०८/७/२०२४ रोजी (आ.क्र.५९१९ दि.१०/७/२०२४) अपिल अर्ज दाखल केला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| ०८/७/२०२४ | १०/७/२०२४ | ०१/८/२०२४ | होय | -- |

सदर अपिलाची सुनावणी दि.६/८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यात आली असल्याचे जा.क्र.उप आयुक्त (सा.प्र.)/आस्था/४४९०, दि.३१/७/२०२४ रोजी कळविण्यात आले आहे. अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते.

## विवेचन

आपल्या कार्यालयाकडील प्राप्त झालेली माहिती असमाधानकारक आहे. आपण प्रसिद्ध केलेल्या यादीनुसार स्वच्छता निरिक्षक पदासाठी पात्र उमेदवारांचे शैक्षणिक व अनुभव दाखले मिळवित व मी विचारलेली माहिती उपलब्ध करुन देणे हे अडचणीचे का आहे? याचा खुलासा द्यावा. आपण स्वच्छता निरिक्षक पदाची पात्र उमेदवारांची यादी ही कागदपत्रे पडताळणी करुन लावलेली असताना ती कागदपत्रे देण्यास काय अडचण आहे. त्याबाबत काय कार्यवाही चालू आहे याचा खुलासा द्यावा. उमेदवारांना नियुक्ती दिलेली आहे का? असे नमूद करुन दि.०८/७/२०२४ रोजी (आ.क्र.५९१९ दि.१०/७/२०२४) अपिल अर्ज दाखल केला आहे.

मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत "स्वच्छता निरिक्षक पदासाठी पात्र झालेल्या उमेदवारांचे कागदपत्र पडताळणीसाठी असलेले कागदपत्रे, पात्र व अपात्र उमेदवारांचे सर्व कागदपत्रे मिळावीत (अनुभव दाखले, बँक, आयकर चे फॉर्म) दि.२७/६/२०२४ (आ.क्र.५०२५, दि.२८/६/२०२४) मिळणेकामी अर्ज दाखल केला आहे. जन माहिती अधिकारी यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/३२७२, दि.२/७/२०२४ अन्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम ८(१)(झ) नुसार माहिती नाकारली आहे.

**अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित होते.** अपिलार्थी यांना दि.५/८/२०२४ रोजी सायं.४.४३ वा. श्रीमती रेवती थिटे (९५५२५६२९७१), वरिष्ठ लिपीक यांनी अपिलार्थी यांना भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधला असता सुनावणीस उपस्थित राहणार नसल्याचे नमूद केले आहे.

आरोग्य निरिक्षक पदाच्या भरतीची प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याने दिलेली माहिती योग्य आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले.

आरोग्य निरिक्षक पदाची नेमणूकीची प्रक्रिया सुरु आहे. दि.२१/०६/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेले जाहीर प्रकटन हे फक्त आरोग्य निरीक्षक (श्रेणी-३) पदाकरिता पात्र व अपात्र उमेदवारांची प्रथमदर्शनी यादी आहे. यामध्ये उमेदवारांकडून हरकती/सूचना ७ दिवसाचे आत सेवाभरती व परीक्षा नियंत्रण विभागाकडे लेखी स्वरुपात सादर करण्यास सांगितले आहे. सध्यस्थितीत, सदर अभिलेखे गोपनीय स्वरूपाचे असल्याने प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच सार्वजनिक स्वरुपाचे अभिलेखे उपलब्ध करून देणे शक्य आहे, असे अपिलाधिकारी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले आहे. सबब, उपलब्ध कागदपत्रांचे आधारे पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग यांनी दिलेली माहिती योग्य आहे. त्यानुसार, सदर अपिल क्र.७२/२०२४ निकाली काढण्यात येत आहे.

P.Patil
12-8-24.

(प्रतिभा पाटील)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**प्रत/-**

जन माहिती अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका.